दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५८ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१० मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नव्हे निवडून येणाऱ्या माणसांची मोळी

# महाराष्ट्रात जनसंघ,शिवसेना अन् मनसे हे तीनच पक्ष निर्माण झाले-राज ठाकरे

**नाशिक (वृत्तसंस्था)**-राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पक्ष नव्हे तर निवडून येणाऱ्या लोकांची बांधलेली मोळी असल्याची तिखट टीका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार यांच्यावर निशाणा साधताना केली. महाराष्ट्रात केवळ तीनच पक्षांची स्थापना झाली. यात जनसंघ, शिवसेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा समावेश आहे, असे ते म्हणालेत.

राज ठाकरे यांच्या उपस्थितीत शनिवारी नाशिकमध्ये मनसेचा १८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी मनसेला कोणत्याही स्थितीत यश मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच महाराष्ट्रात केवळ तीनच पक्ष निर्माण झाल्याचे नमूद करत शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा मुळात पक्षच नसल्याची टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा पक्ष नाही. ती निवडून येणाऱ्या लोकाची बांधलेली मोळी आहे. शरद पवार आतापर्यंत हेच करत आलेत. ते वेगळे झाले तरी तेच निवडून येणार, असे ते म्हणाले.महाराष्ट्रात आतापर्यंत केवळ जनसंघ, शिवसेना व मनसे हे तीनच पक्ष निर्माण झाले. हे पक्ष तळागाळातून निर्माण झाले. आणि त्यात विशेष ह्या पक्षातील कार्यकर्ते ९९% सर्वसामान्य घरातील होते, असे राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आतून एकच असल्याची टीकाही केली.मनसेला १८ वर्षे पूर्ण होत असताना मला तुम्हाला राजकीय इतिहास सांगण्याची गरज वाटत आहे. सद्यस्थितीत प्रत्येकाल वडा टाकला की तळून आलेला पाहिजे. सर्वांना फास्टफूड पाहिजे. पण राजकारणात वावरायचे असेल तर संयम हवा असतो. राजकारणात खस्ता खाल्याशिवाय यश मिळत नाही. तुम्हाल नरेंद्र मोदी किंवा भाजपचे यश दिसत असेल. पण भाजपसाठी अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, प्रमोद महाजन, गोपिनाथ मुंडे आदी अनेक नेत्यांनी अनेक वर्षे कष्ट घेतले. खस्ता खाल्या. त्यानंतर त्यांना आज हे यश मिळाले. त्यामुळे आपणही संयम राखण्याची गरज आहे, असे राज ठाकरे म्हणाले.गत १८ वर्षांत आपण अनेक चढउतार पाहिले. पण तुम्ही



सर्वजण माझ्यासोबत ठामपणे राहिलात. आपल्याला यश नक्की मिळणार. मी मिळवून देईन. पण पेशन्स हवेत. सध्या राज्यात पक्षांतराचा ट्रेंड सुरू आहे. काहींच्या कडेवर दुसऱ्यांची पोरं खेळताना दिसत आहेत. पण मला माझ्या कडेवर माझी पोरं खेळवायची आहेत. माझ्या खांद्यावर माझी पोरं खेळवण्याची ताकद माझ्यात आहे, मला राजकारणात माझे सहकारी मोठे करायचे आहेत, असेही राज ठाकरे यावेळी भाजपवर निशाणा साधताना म्हणाले.राज ठाकरे यांनी यावेळी मराठा आरक्षणावरून महाराष्ट्रात केवळ राजकारण सुरू असल्याचाही आरोप केला. मराठा आरक्षणावरून फक्त राजकारण सुरु आहे. मी जरांगे-पाटील ह्यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांच्या समोर सांगितले होते... आरक्षण मिळणार नाही. ह्याचा अर्थ मराठा समाजाला आरक्षण मिळू नये असे नाही तर तांत्रिकदृष्ट्या ते तितकंच किचकट आहे.राज्यात जी मराठा आरक्षणावरून जी आश्वासनं दिली जातात ती सर्व खोटी आहेत. त्यासाठी केंद्राने पुढाकार घ्यायला हवा. पण केंद्राने जर मराठा आरक्षण द्यायचं ठरवलं तर त्यांना प्रत्येक राज्यातील आरक्षणाची मागणी असलेल्या जातींना आरक्षण द्यावं लागेल, जे नेत्यांना राजकीयदृष्ट्या अडचणीचं ठरेल म्हणून हा प्रश्न रखडवत ठेवला जातो. आणि जाती भेद निर्माण करून मतांचं राजकारण केले जाते, असे राज ठाकरे म्हणाले.माझ्या पक्षातील सहकाऱ्यांनी कुणालाही जातीने पाहू नये, जातीवरून भेद करू नये. मला ते चालणार नाही. हा खालच्या जातीचा, तो वरच्या जातीचा हे कुणी ठरवले? आपण शिवछत्रपतींचे नाव घेतो ज्यांनी अठरापगड जातींना एकत्र आणून रयतेचं स्वराज्य उभे केले, असेही राज ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले.

## औद्योगिक शांतता ठेवण्यासाठी कामगारांचे प्रश्न प्राथमिकतेने सुटावे-आ.किशोर जोरगेवार

### विविध कामगार संघटनांना घेऊन आमदार किशोर जोरगेवार यांनी घेतली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर हा वीज उत्पादक जिल्हा आहे. परिणामी वीज कामगारांची संख्या येथे अधिक आहे. मात्र कामगारांच्या अनेक मागण्या आजवर सुटु शकलेल्या नाही. राज्याला उजेळात ठेवण्यासाठी अहोरात्र काम करणा-या कामगारांच्या समस्या आपण प्राथमिकतेने सोडविल्या पाहिजे. औद्योगिक शांती राखण्यासाठीही हे गरजेचे असल्याचे आज आमदार किशोर जोरगेवार यांनी उपमुख्यमंत्री तथा उर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांना म्हटले असून कामगारांच्या समस्या सोडविण्याची मागणी केली आहे.

विविध विज कामगार संघटनांच्या नेत्यांना घेऊन आज शनिवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी नागपूर येथील देवगीरी बंगल्यावर उपमूख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी माजी ऊर्जामंत्री तथा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती होती.



चंद्रपूरातील वीज कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. नुकतीच त्यांनी वीज कामगारांची सिएसटीपीएसच्या अधिका-यांसह बैठक घडवून आणली होती. या बैठकीत कामगारांच्या अनेक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यातील काही समस्या सुटल्या आहेत. मात्र शासनपातळीवरील कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी वीज कामगार संघटनेच्या पदाधिका-यांना घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी कामगारांच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली असुन सकारात्मक चर्चा झाली आहे. यावेळी कामगारांचे वेतन कंत्राटदाराकडे न जाता ते सरळ कामगारांच्या खात्यावर जमा करण्यात यावे अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे. दरवर्षी कामगारांचे प्रोग्रेस रिर्पोट ही तयार करण्यात यावा असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

चंद्रपूरात महाऔष्णिक विद्युत केंद्रात जवळपास ४ हजार वीज कामगार काम करत आहेत. ईतर ही खाजगी विद्युत केंद्रात कामगारांची संख्या मोठी आहे. अत्यंत जोखमीचे काम ते करत असतांना त्यांच्या समस्या सुटल्या पाहिजे असे ही ते यावेळी म्हणाले. याबाबत उच्च अधिका-यांसोबत कामगार संघटनांची बैठक घेण्यात यावी अशी मागणीही यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे. सर्व मागण्या आपण समजून घेतल्या आहे. कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. यावेळी कामगार संघटना आणि उपमूख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सकारात्मक चर्चा झाली आहे.

## कुलथा यात्रा महोत्सवाला गेलेला युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू



**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

गोंडपिपरी तालुक्यातील कुलथा येथे महाशिवरात्री निमित्त यात्रा भरते. कुलथा येथे दोन नद्यांचा संगम असून मोठ्या प्रमाणात नदीवर आंघोळ करण्यासाठी नागरिकांची गर्दी असते अशातच आज दि ९ शनिवारी दुपारी एक वाजता दरम्यान आंघोळ करायला गेलेल्या युवकाचा पाण्यात बुळून मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली.

गोंडपिपरी तालुक्यातील कुलथा हनुमान मंदिर येथे सर्व धर्म समभावाचे दर्शन पाहायला मिळते.हनुमानजींच्या मूर्तीचे दर्शन घेणारे हजारो भक्त शिवरात्री,आषाढी एकादशीनिमित्त कुलथा यात्रा महोत्सवाला येतात हजारो भक्त दर्शनासाठी धार्मिक भावनेतून रांग लावतात.यावेळी हनुमानजीची मूर्ती त्यांचे दुःख दूर करतात हा तिथे येणाऱ्या प्रत्येक भाविकांचा आत्मविश्वास आहे.

कुलथा हे गाव गोंडपिपरी - मूल मार्गावर वढोली येथून उजवीकडे ४ कि. मी अंतरावर आहे.अंधारी व वैनगंगा ह्या दोन्ही नद्यांच्या मधोमध वसलेले कुलथा गाव आहे.

महाशिवरात्री निमित्त मोठी यात्रा भरत असते. दि.७ गुरुवार पासून यात्रा महोत्सवाला सूरवात झाली असून ही यात्रा १२ तारखेपर्यंत असते तालुक्यातील धानापुर येथील मृतक आकाश अशोक शेडमाके वय २३ ,गणेश मरसकोले,सोमनाथ गेडाम दोघेही राहणार धाणापुर व तन्मय मडावी (भामरागड जी गडचिरोली) चौघे मित्र यात्रेत आल्यानंतर नदी पात्रात फार पाणी नसल्याने मंदिरापासून एक किलोमीटर अंतरावर अंघोळीला गेले. पाण्याचा अंदाज न आल्याने आकाश अशोक शेडमाके वय २३ हा पाण्यात बुळुन बेपत्ता झाला होता.घटनास्थळी गोंडपिंपरी चे ठाणेदार रमेश हत्तीगोटे, पिएसआय मोगरे दाखल होऊन बेपत्ता युवकाचा शोध घेण्यासाठी शोधमोहीम राबवली तब्बल दोन तासानंतर अडिज वाजता मृतदेह सापडला.घटनास्थळी पंचनामा करत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविले.

## बाबूपेठ येथील महादेव मंदिराकरीता १ कोटी ५८ लक्ष रुपये मंजूर

### सांस्कृतिक कार्य मंत्री मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांचे फलित

### विश्वस्त मंडळाने मानले ना. मुनगंटीवार यांचे आभार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव एकछत्र योजनेअंतर्गत बाबूपेठ येथील महादेव मंदिर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्ती कामाकरीता १ कोटी ५८ लक्ष ५९ हजार ४९८ रुपये इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष प्रयत्नातून हा निधी मंजूर करण्यात आला आहे.

बाबूपेठ येथील महादेव मंदिर हे चंद्रपूर शहराच्या पूर्वेस सुमारे ५ कि.मी.अंतरावर स्थित आहे. या मंदिराचे बांधकाम गोंड राजाच्या काळात करण्यात आले. गोंड राजा बिरशहा यांची राणी हिराई यांचे दिवाण बापूजी वैद्य यांनी या मंदिराचे बांधकाम केले. मंदिरामध्ये शिवलिंग असून इतर इंद्र, वरूण, गणपती, अग्नी, नाग आदी देवतांची शिल्पे आहेत.सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बाबूपेठ येथील महादेव मंदिराच्या जतन आणि दुरुस्तीचे काम तात्काळ होण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची सूचना संबंधित यंत्रणेला केली होती. सदर बाबी विचारात घेऊन रासायनिक प्रक्रियेद्वारे मंदिराचे बांधकाम स्वच्छ करणे, ग्राऊटिंग करणे, पॉइंटिंग करणे, लोखंडी ग्रील बसविणे, शोभिवंत झाडे लावणे, सूचना फलक, माहिती फलक,



दिशादर्शक फलक आदी कामे यामध्ये समाविष्ट आहेत.महादेव मंदिराच्या जतन दुरुस्तीच्या कामासाठी १ कोटी ५८ लक्ष ५९ हजार ४९८ इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल मंदिराच्या विश्वस्त मंडळाकडून ना. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे

## आज जिल्हा स्तरीय महिला मेळाव्याचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

जागतिक शिक्षक महासंघ संलग्न अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ शाखा चंद्रपूर जिल्हाच्या वतीने १० मार्च रोज रविवारला स्थानिक साई मंगल कार्यालय वरोरा येथे जिल्हा स्तरीय महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्याला उदघाटक म्हणून वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर या असतील तर अध्यक्षा म्हणून अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्षा देविदास बस्वदे हे असतील. विशेष अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नयोमी साटम तर प्रमुख अतिथी म्हणून अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष अन्नाराव आडे,अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ महिला विभाग प्रमुख वंदना भोयर, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ राज्य संयुक्त चिटणीस उर्मिला बोंडे,अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे माजी कार्याध्यक्ष पुरुषोत्तम गंधारे, वरोरा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्थेचे अध्यक्षा संजय जांभुळे हे असतील या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## नथ्थूजी मुडेवार यांचे निधन

**चंदनखेडा/भद्रावती । प्रतिनिधी**



भद्रावती तालुक्यातील चंदनखेडा येथील रहिवासी नथ्थूजी मुडेवार यांचे ०९/३/२४ ला वयाच्या ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. ते तालुक्यातील ज्येष्ठ काँग्रेस नेते श्री पुरुषोत्तम मुडेवार यांचे काका आणि तालुक्यातील प्रतिष्ठीत व्यावसायिक आणि सामाजिक कार्यकर्ते श्री सुधीर मुडेवार यांचे चुलत आजोबा होते. त्यांच्या पश्चात मुलगी,सुन, नातवंडे तथा मोठा आप्तपरिवार आहे.

## स्व.खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धेचे क्रीडा मंत्री संजय बनसोडेंच्या हस्ते उदघाटन

**उदगीर :** क्रीडा व युवक कल्याण सेवा संचालनालय आयोजित स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी ऐतिहासिक उदगीर शहर सज्ज झाले आहे. क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते स्पर्धेचे भव्य उद्घाटन सोहळा आज ९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता आहे. यावेळी प्रख्यात अभिनेत्री शेफाली जरीवाला यांचे नृत्य अविष्कारासह लेझर शो व नयनरम्य आतिषबाजी करण्यात येणार आहे. स्पर्धेचे भव्य उद्घाटन व राज्यातील अव्वल कुस्तीगीरांचा खेळ पहाण्यासाठी शहरात उत्सुकता दिसून येत आहे. उदगीरमधील जिल्हा परिषद मैदानावर या स्पर्धेची जय्यत तयारी सुरू झाली आहे. क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दुरदृष्य प्रणालीव्दारे तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर तयारीची पहाणी उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, उपसंचालक संजय सबनीस, उपसंचालक युवराज नाईक, माजी उपसभापती बाळासाहेब मरालापल्ले, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी आज सकाळी केली. ९ ते ११ मार्चपर्यंत कुस्तीप्रेमींसाठी ३ दिवस पर्वणी ठरणार्या स्पर्धेत १० जिल्ह्यातील ३६ खेळाडु असे एकुण ३६० खेळाडु उदगीर शहरात दाखल झाले आहेत.लातूर जिल्हयातील उदगीर शहरात प्रथमच होणार्या स्पर्धेत राज्यातील ३६० खेळाडू सहभागी होणार आहेत. यासाठी महाराष्ट्रातील खेळाडूख पंच व पदधिकिर्यांचे आगमन उदगीर शहरात होत आहे. फ्रीस्टाईल, ग्रीको रोमन व महिलांचे संघ मैदानात उतरणार आहे. स्पर्धेतील सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकविजेत्यांना अनुक्रमे ६० हजार, ५० हजार व ३० हजार रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धेचे उघाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हयाचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज व पर्यटन मंत्री गिरीष महाजन हे उपस्थित राहणार आहेत तर उद्घाटक म्हणून राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते होणार आहे.

# प्लेग रुग्णसेवेत जीवन समर्पित!

**शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणारऽऽऽ.. अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या.. सविस्तर वाचा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दशैलीतून... संपादक.**

सावित्रीमाई फुले यांचा जन्म दि.३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवासे- पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महाराष्ट्रात महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना शिक्षणसम्राट महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह-काव्यफुलेमधून दिला-

विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।
तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन।।


म.जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षांच्या होत्या. शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वत: शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि.१ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा!

इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे।।
इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे।।
इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।

ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

काळरात्र गेली। अज्ञान पळाले।।
सर्वे जागे केले। सूर्याने या।।
शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य।।
तेजस्वी अपूर्व। उगवला।।

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणारऽऽऽ.. अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण,



दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-


स्वामी जोतीबांच्या लागे मी चरणी!
त्यांची गोड वाणी मनी घुमे!!
महार मांगाची करते मी सेवा!
आवडीच्या देवा स्मरूनिया!!

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अपप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म.फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली।।
ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकूनी घ्या रे।।
ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे।।
मुलाबाळांना आपण शिकवू आपणही शिकू।।
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्म शिकू।।
नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन।।
शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन।।
राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो।।
यशाची आमच्या दुंदभी नगारे झडो।।
'इडा पिडा टळो' या कार्यी भट न पडो।।
असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।।
परंपरेच्या बेड्या तोडुनी शिकण्यासाठी उठ।।

काव्यफुलेच्या माध्यमातून रंजल्या-गांजलेल्या दलित-पीडित समाजाला शिक्षणामृत पाजणाऱ्या राष्ट्रपितामह क्रांतीबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे विचारधन हीच आपली संपत्ती नव्हे का? प्लेगने बाधीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीमाईंनाच प्लेगची लागण झाली. दि.१० मार्च १८९७ रोजी त्या निर्मिकांकी कायमच्या निद्रिस्त झाल्या.

!! स्मृती दिनी सावित्रीमाईंस व त्यांच्या जनोद्धारक कार्यास विनम्र अभिवादन !!



श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
मु.पो.ता.जि.गडचिरोली
दूरभाष- ७७७५०४१०८६.

# मनसेची भूमिका आमच्या विचारांशी विसंगत नाही-देवेंद्र फडणवीस

**नागपूर**-महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने घेतलेली व्यापक भूमिका आमच्या विचारांशी विसंगत नाही. विशेषतः त्यांचा प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा आम्हालाही मान्यच आहे, असे सूचक विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात भाजप व मनसेच्या संभाव्य युतीची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे.

राज ठाकरे यांनी शनिवारी मनसेच्या १८ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात पक्षाला यश मिळवून देण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. तसेच आपली दुसऱ्यांची मुले अंगावर खेळवण्याची नव्हे तर स्वतःच्या सहकाऱ्यांना मोठे करण्याची इच्छा असल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या या विधानाविषयी पत्रकारांनी भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना छेडले असता त्यांनी मनसेची भूमिका भाजपच्या विचारांशी विसंगत नसल्याचे स्पष्ट केले.मनसेने जी काही व्यापक भूमिका घेतली आहे ती आमच्या



विचारांशी विसंगत नाही. प्रादेशिक अस्मिता आम्हालाही मान्यच आहे. महाराष्ट्रात राहून मराठी माणसांविषयी बोलणे हे योग्यच आहे. त्यांनी मराठी माणसांच्या हक्कांसह हिंदुत्त्वाविषयी ठाम भूमिका घेतली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत मनसे व भाजप यांच्यात फारसे अंतर राहिले नाही. बाकी निवडणुकीत काय होईल सांगता येत नाही. जे काही होईल ते चर्चेअंती होईल. योग्य वेळी योग्य गोष्टी होतच असतात, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.यावेळी पत्रकारांनी त्यांना महायुतीत मनसेच्या रुपात चौथा सदस्य येणार का? असा थेट प्रश्न केला असता फडणवीस यांनी असे काहीही नसल्याचे स्पष्ट केले. मी कोणतेही संकेत तुम्हाला दिले नाही. केवळ तुमचे डोके क्लिअर केले आहेत. तुम्ही जे अंदाजपंची चालवता ते पाहून मी वस्तुस्थिती सांगितली आहे, असे ते म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी जागावाटपाच्या मुद्यावर शुक्रवारी दिल्लीत झालेली बैठक सकारात्मक झाल्याचेही सांगितले. जागावाटपाच्या मुद्यावर दिल्लीत झालेली बैठक सकारात्मक झाली. एकाच बैठकीत सर्वच निर्णय होतील असे नसते. पण कालच्या बैठकीत ८० टक्के काम झाले आहे. २० टक्के काम अजूनही सुरू आहे. ते देखील फोनवरून होत आहे. या प्रकरणी लवकरच सर्वकाही स्पष्ट होईल, असे ते म्हणाले.

# उपवासाला भगर खाल्याने सात जणांना विषबाधा

**जिंतूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरगिळवाडी,चिंचोली दराडे व ब्राम्हणगाव येथील नागरिकांनी एकादशी व महाशिवरात्री निमित्त उपवासाला भगर खाल्यामुळे विषबाधा झाली असून यात सात जणांवर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

भागवत एकादसी व महाशिवरात्री निमित्त मोठ्या प्रमाणात उपवास करतात यावेळी एकादशी व महाशिवरात्री सलग आल्यामुळे दोन दिवस उपवास करण्यात आले उपवासात काल रात्रीच्या वेळी व सकाळी जिंतूर तालुक्यातील बोरगिळवाडी येथील अशोक दुभळकर वय ४५ वर्ष संगीता दुभळकर वय ३० वर्ष,सोनाली दुभळकर वय ३५ वर्ष,अंजना दुभळकर वय ३० वर्ष ब्राम्हणगाव येथील अशोक माघाडे वय ५० वर्ष,लताबाई माघाडे वय ४० वर्ष तर चिंचोली दराडे येथील लक्ष्मीबाई मोरे वय ६० वर्ष यांनी भगर खाल्याने उलटी मळमळ



याचा त्रास होऊ लागला म्हणून नातेवाईकांनी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले यावेळी डॉ गजानन काळे,डॉ अजमल शेख,परीचालीका रेश्मा घतघिणे यांनी तातडीने उपचार केले असून विषबाधा झालेल्या भाविकांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे

# तयास मानव म्हणावे का ?

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले

सावित्रीमाईनी दया, प्रेम, परोपकार, करुणा, अहिंसा, सत्य,समता,मानवतावाद आदी मानवी मूल्ये आयुष्यभर जपली, या मूल्यांची पेरणी त्यांनी आपले विचार, कार्य-कर्तुत्व आणि साहित्य 'काव्यफुले' आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या दोन्ही कविता संग्राहातून केली आहे. तयास मानव म्हणावे का ? ही कविता 'काव्यफुले' या कविता संग्रहातील आहे. बारा कडव्याची ही एक दीर्घ कविता असून त्यातील केवळ चार कडव्यांचा आशय प्रस्तुत लेखात मांडला आहे. सावित्रीमाई माणसाला गुलामगिरीचे दुःख नाही. तयास मानव म्हणावे का ? असा मुलभूत प्रश्न विचारतात. ही गुलामगिरी रूढीची, अंधश्रद्धेची, सत्तेची किंवा मानसिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक अशा कोणत्याही प्रकारातील व स्तरावरील असो. ती गुलामगिरी झुगारून दिली पाहिजे, गुलामगिरी विरुद्ध आवाज उठवला पाहिजे, 'गुलामीगिरी नष्ट करण्याचे एकमेव साधन शिक्षण हे आहे', यावर सावित्रीमाईचा ठाम विश्वास आहे. एकुण मानवी जीवन अर्थ, कार्यप्रवण व स्वातंत्र्याचा आग्रह धरणारी आणि शिक्षणाचे महत्व सांगणारी तयास मानव म्हणावे का ? ही कविता आहे.




डॉ.प्रकाश खेत्री,
छ.संभाजीनगर,
७८४३०९२२४४


**ज्ञान नाही,**
**विद्या नाही,**
**ती घेण्याची गोडी नाही,**
**बुद्धी असूनही चालत नाही.**
**तयास मानव म्हणावे का ?**

मानवास बुद्धी आहे, मात्र ज्ञान नाही, विद्या नाही, शिक्षण नाही. ते घेण्याची गोडी नाही. तयास मानव म्हणावे का ? सावित्रीमाईनी हा प्रश्न विचारत खऱ्या मानवाचे लक्षणे सांगितली आहेत. साठलेल्या पाण्याप्रमाणे जे गतीहीन आहे ते सडून जाते वा दूषित होते. या निसर्ग नियमाप्रमाणे ज्या मानवात परिवर्तनाची आस किंवा चेतना नाही, तो मानव म्हणून घेण्यास पात्र नाही. या उलट जो गंगेच्या पाण्याप्रमाणे आहे, स्वतःच्या बुद्धीला निरंतर गतिमान, प्रवाहित व परिवर्तनशील ठेवतो. ज्ञान व विद्येच्या कण-कण वेचण्यासाठी क्षणनक्षणाचा विचार करतो, तोच खऱ्या अर्थाने माणूस आहे. असे सावित्रीमाई यांना सुचवायाचे असेल. सावित्रीमाई म्हणतात, 'मनुष्य हा जन्मतः बुद्धिमान प्राणी समजला जातो, बुद्धीमुळे त्याने इतर प्राण्यांच्या मानाने आपल्या विधायक विकास केला आहे'. बुद्धीला तो जेवढा ताण देतो, तेवढा बुद्धीचा विकास होतो. असे आज शिक्षणतज्ञ सांगत आहेत. कवयित्रीने कवितेच्या प्रारंभीच्या कडव्यात जाणीवपूर्वक शिक्षण, ज्ञान आणि विद्या हे तीन अर्थपूर्ण शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरले आहेत, कारण शिक्षण म्हणजे माहिती मिळवणे, ज्ञान म्हणजे त्या माहितीचा जीवनात व व्यवहारात उपयोग करणे आणि विद्या म्हणजे विशुद्ध किंवा यथार्थपणे विश्वाकडे पाहण्याची दृष्टी असणे. हे अर्थ त्यांना अभिप्रेत असावेत.सावित्रीमाईचे वैयक्तिक जीवन हे सार्वजनिक जीवन बनले होते, 'संपूर्ण आयुष्य केवळ स्त्रीशुद्रतिशूद्र यांच्या शिक्षणाचा ध्यास, हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव श्वास बनला होता', तेव्हा तयास मानवी मानव म्हणावे का ? हा केवळ काव्य प्रपंच नाही, तर तो प्रबोधनात्मक उपदेश आणि जीवन मार्ग आहे. कारण त्यांचा ज्ञानी समाज निर्माण करावयाचा होता. ते कष्टाशिवाय शक्य नाही. तेव्हा त्या म्हणतात,

**देरे हरि पलंगी काही**
**पशुही ऐसे बोलत नाही**
**विचार ना आचार नाही**
**तयास मानव म्हणावे का ?**

बुद्धिमान म्हणणारा माणूस काही काम न करता आयते खातो, पशु, पक्षी ही असे कधी करत नाहीत, पशूंना जे कळते ते माणसाला कळत नाही. तयास मानव म्हणावे का ? असा प्रश्न कवयित्रीने या ओळीत विचारला आहे. 'देरे हरी पलंगा वरी', 'असेल हरी तर दिल खटल्यावरी', 'जो चोच देतो तो चारा देतो', इत्यादी मानवनिर्मित लोक म्हणी मानवी समाजात रूढ आहेत, माणूस हा विचारक्षम प्राणी आहे, मेंदू, बुद्धी असूनही असे बोलतो, ही गोष्ट सावित्रीमाईंना हश्यास्पद वाटते, कारण






बुद्धी नसणारे प्राणी ही असे करत नाहीत, पशु-पक्षी, प्राणी हे अन्न मिळवण्यासाठी रानोमाळ भटकंती करतात. सर्व पशु दैव , नशिबाची साथ न घेता प्रयत्नवादाचा स्वीकार करून, आपल्या गरजा पूर्ण करतात, जीवन जगतात. मात्र स्वतःला बुद्धिमान आणि प्रगतशील म्हणणारा माणूस दैववाद आणि नशिबावर अवलंबून राहतो, आळसात बुडतो आणि मातीमोल होतो. तेव्हा तयास मानव म्हणावी का ? हा प्रश्न त्या करतात.

सावित्रीमाईना स्त्रीशुद्रतिशूद्र लोकांमधील नशीब, नाकर्तेपणा, नकारात्मक विचार, नाहक खर्च हे अवगुण नष्ट करायचे होते. त्यासाठी प्रस्तुत ओळीत पशु व मानव यातील फरक सांगून प्रयत्नवादी, आशावादी जीवनाचे ध्येय ठेवणाऱ्या पशुतील सकारात्मक, चांगुलपणाच्या प्रवृत्तीला साथ दिली आहे, तर नशिबवादी, निराशात्मक, आळशी माणसातील नकारात्मक, वाईट व दुष्ट प्रवृत्तीला लाथ दिली आहे. त्यावर माईनी प्रहार केला आहे.

**पोरे घरात कमी नाहीत**
**तयांच्या खाण्यासाठी ही**
**ना करी उद्योग काही**
**तयास मानव म्हणावे का ?**

सावित्रीमाई यांच्या विचारातील स्पष्टोक्ती प्रस्तुत ओळीत दिसून येते, कवयित्री येथे अज्ञानी, आळशी, अंधश्रद्धेच्या आधारे जीवन घालविणाऱ्या स्त्रीशुद्रातीशुद्राना अगदी सडेतोडपणे त्यांच्या नाकर्तेपणाचा जाब विचारतात. तसेच 'ज्यांनी केले पाप त्याला मुली आपोआप', 'मुले देवाघरची फुले' या खुळ्या अंधश्रद्धा, अंधकल्पनांचा आधार घेऊन केवळ मुले जन्माला घालणे हाच अज्ञानी लोकांचा उद्योग आहे. या अज्ञानी लोकांवर टीकात्मक आलोचना करून कवयित्री त्यांना स्वतःच्या जीवनाचा विचार करावयाला सांगतात. त्या म्हणतात मानवाला त्या निर्मिकाने इतर प्राण्यांपेक्षा वेगळे का बनवले ? त्याला दोन सर्जनशील हात व दहा बोटे कशासाठी दिली ? नवनिर्मितीची नवचेतनेची शक्ती दिली ती कशासाठी ? मानवाने मुले केवळ ईश्वराची देणगी म्हणून स्वीकारली परंतु त्यांच्या खाण्यापिण्याचा किंवा राहण्याचा विचार कधीच केला नाही. त्याच्या मूलभूत गरजा भागवण्याचे त्यांच्या गरिबीमुळे अज्ञानामुळे शक्य झाले नाही, तर त्याच्या उत्थान, परिवर्तन आणि भविष्यातील प्रगती, विकासासाठी काही उद्योग करणे अशक्यप्राय गोष्ट आहे. याची सावित्रीबाईंनी मनोमनची चिड होती, घरातील कर्तेपुरुष जर निष्काळजीपणे नाकर्तेपणाने वागू लागले, तर तयास मानव म्हणावे का ? प्रस्तुत ओळीत सावित्रीमाईच्या कृतिशील समाजसेविकेची भूमिका लक्षात येते, त्या खऱ्या अर्थाने गरिबांच्या कैवारी होत्या. हे त्यांच्या विचारावरून दिसून येते.

**सहानूभूती मिळत नाही**
**मदत न मिळेल कोणाचीही**
**पर्वा न करी कशाचीही**
**तयास मानव म्हणावे का ?**

जीवनात अर्थ वा पैसा असेल तरच व्यक्तीच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो, अर्थ पैसा केवळ कर्मप्रिय, उद्योगशील व कष्टाळू माणसालाच मिळतो, त्यांचे जीवन सार्थक होते, हा लोक व्यवहाराचा सिद्धांत आहे. पैसा नसेल तर कोणतेही लोक जवळ येत नाहीत, तेव्हा सहानुभूती मिळत नाही, कोणाची मदत मिळत नाही, जवळ आलेले मित्र व नातेसंबंध दूर होतात, माणसाचे हितचिंतक हे निंदक बनतात. हा जीवन व्यवहाराचा अनुभव त्या कथन करत. या सर्व गोष्टीचा सारासार विचार आणि कशाचीही पर्वा न करणाऱ्याला मानव म्हणावे का ? अज्ञानाने पछाडलेल्या, आळसाने जखडलेल्या लोकांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन नकारात्मक बनतो. अशा गरीब बनलेल्या लोकांना कोणाचीही सहानुभूती मिळत नाही. ते केवळ उपेक्षा व अवहेलनेस पात्र ठरतात. कारण त्यांचे सारे जीवन अचेतनात्मक बनलेले असते, याच्या जीवनात भावभावनाचा काहीही संबंध उरलेला नसतो, अशा दयनीय परिस्थितीत जीवन जगणाऱ्या लोकांची सावित्रीमाई येथे श्रमाविषयीची बेपरवाही, बेफिकिरी व जिवंतपणे जीवनाविषयी असणारी उदासीनता, अजागृकता स्पष्ट करून, तयास मानव म्हणावे का ? असा प्रश्न अज्ञानी लोकांना विचारतात. त्या साठी सर्वांना ज्ञानी होण्याचा सल्ला देतात. हा सल्ला व उपदेश आपण क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृतिदिनी अंगिकारला पाहिजे, हीच खरी सावित्रीमाईना आदरांजली ठरेल...!

# बनमेरू विज्ञान महाविद्यालयामध्ये ७ वा राष्ट्रीय लोणार विज्ञान महोत्सव उत्साहात साजरा

**लोणार | प्रतिनिधी**

स्थानिक कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय लोणार येथे राष्ट्रीय विज्ञान दिन आणि लोणार सरोवर संवर्धन जनजागृती या उद्दिष्टाने दिनांक ०४ आणि ०५ मार्च २०२४ रोजी सातव्या राष्ट्रीय लोणार विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. हे आयोजन कै कु. दुर्गा क. बनमेरू

विज्ञान महाविद्यालय लोणार व लोणार सायन्स सेंटर- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कै. कमलाबाई बनमेरू महिला महाविद्यालय, लोणार, नारायणराव नागरे महाविद्यालय- दुसरबीड, बुरुंगले महाविद्यालय शेगाव, आर. ए. महाविद्यालय वाशिम, जिजामाता महाविद्यालय बुलढाणा आणि विमुक्त फाउंडेशन पुणे यांच्या सहयोगाने संपन्न झाले.





या विज्ञान महोत्सवास मा.डॉ. पंडित विद्यासागर (माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड), मा. सौ. उषाताई गोले (अध्यक्षा, अमृत सेवाभावी संस्था परभणी), डॉ. प्रसाद वाडेगावकर, (प्र- कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ), डॉ. संजय ढोले (पुणे विद्यापीठ), डॉ. विजय नागरे (व्यवस्थापन परिषद सदस्य अमरावती विद्यापीठ) डॉ. संतोष बनमेरू( सचिव,अमृत सेवाभावी संस्था परभणी), प्रमुख आयोजक डॉ. प्रकाश बनमेरू(प्राचार्य, बनमेरू महा. लोणार) डॉ.यादवकुमार मावळे (विभागप्रमुख भूगर्भशास्त्र विभाग अमरावती विद्यापीठ आणि समन्वयक ,लोणार सायन्स सेंटर ,लोणार), डॉ. ओमप्रकाश झंवर (प्राचार्य आर. ए. महा. वाशिम), डॉ. आर ई खडसान (प्राचार्य, बुरुंगले महाविद्यालय शेगाव), डॉ. प्रशांत कोठे (प्राचार्य जिजामाता महा. बुलढाणा), डॉ. विजय दाभाडे व डॉ. सिद्धार्थ पैठणे (सदस्य अमृत सेवाभावी, संस्था, परभणी) इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या महोत्सवाची सुरुवात विज्ञान ज्योत रॅलीने झाली. रॅली लोणार धारतीर्थ येथून सुरू झाली आणि रॅलीमध्ये विज्ञान ग्रंथ दिंडी, डॉ. कलाम फिरती प्रयोगशाळा, अमळनेर, मिसाईल, उपग्रह इत्यादींचे मॉडेल तसेच सी व्ही रमण, संत गाडगेबाबा यांच्या वेशभूषा साकारलेली विद्यार्थी यांचा समावेश होता. यानंतर महोत्सवाचा उद्घाटन समारंभ पार पडला. यावेळी प्रास्ताविक सादर करताना प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू यांनी लोणार विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात मागचा हेतू स्पष्ट करीत उपस्थितांना लोणार विज्ञान महोत्सवाचे महत्त्व पटवून दिले. उद्घाटनपर मार्गदर्शन करताना डॉ. पंडित विद्यासागर यांनी लोणार येथे विज्ञान संशोधन केंद्र सुरू व्हावे ही संकल्पना पहिल्या विज्ञान महोत्सवमध्ये मांडली होती व त्या दृष्टीने असे केंद्र आता सुरू होत आहे याबद्दल आनंद व्यक्त केला. विज्ञान महोत्सवाची व्याप्ती वाढत असून येणाऱ्या काळात हा महोत्सव आंतरराष्ट्रीय पातळी पर्यंत जाईल असा आशावाद व्यक्त केला. यानंतर प्रमुख अतिथी मार्गदर्शनमध्ये प्र.कुलगुरु प्रसाद वाडेगावकर यांनी सहा महाविद्यालये व अमरावती विद्यापीठ एकत्र येऊन हा लोणार महोत्सव साजरा करत आहे आणि येऊ घातलेल्या क्लस्टर पद्धतीप्रमाणे हे आयोजन केले ही खूप अभिमानास्पद बाब आहे असं नमूद केले. विद्यापीठाने सुरू केलेल्या सायन्स सेंटर लवकरच कार्यन्वित करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या महोत्सवात सहभागी झालेल्या विद्यार्थांना सीबीसीएस पद्धतीत क्रेडिट दिले जातील हे नमूद केले. डॉ. संजय ढोले यांनी ह्या विज्ञान महोत्सवातून चांगल्या संकल्पना समोर येत आहेत आणि ह्या संकल्पना समोर जाऊन यामधून चांगले संशोधक निर्माण होतील तसेच अशा महोत्सवामधूनच आपल्या देशाला पेटंट आणि नोबेल पारितोषिक मिळतील असा आशावाद व्यक्त केला.यानंतर डॉ. यादवकुमार मावळे यांनी लोणार सरोवराला विविध माध्यमातून जतन आणि संवर्धन करण्यासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत मिळालेल्या प्रयोगशाळेचे माध्यमातून आपणही लोणार सरोवरचं संवर्धन आणि जतन तसेच पाण्यामध्ये असलेले विविध गुणधर्मांचा अभ्यास करून उत्कृष्टपणे माहिती संकलन करू व ते निश्चितपणे जगासमोर मांडू असा आशावाद व्यक्त केला. यानंतर डॉ. विजय नागरे यांनी लोणार विज्ञान महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या संशोधनाला वाव निश्चित मिळेल व विद्यार्थ्यांनी सुद्धा चांगले संशोधन कार्य करून आपलं नाव उज्वल करावे अशी अशा व्यक्ती केली. विद्यापीठाने सुद्धा या लोणार विज्ञान प्रयोग शाळेच्या माध्यमातून उच्च संशोधनसाठी स्थानिक बनमेरू विज्ञान महाविद्यालयाला व्यवस्थापन आणि नियोजन करण्यासाठी संधी द्यावी अशी भूमिका मांडली.डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी लोणार विज्ञान महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थांना चांगलं पाठबळ देऊन त्यांना संशोधनाकडे वळविण्याचा प्रयत्न करूया व विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले संशोधन कार्य व्यवस्थित पार पडून आपणही आयआयटी एनआयटी सारख्या विद्यार्थ्यांना स्पर्धा देऊ शकतो यासाठी आपण आपला आत्मविश्वास जागरूक ठेवून आपले कार्य प्रामाणिकपणे व श्रद्धेने करावे अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी डॉ.आर. ई .खडसान, डॉ. प्रशांत कोठे, डॉ. संतोष बनमेरू यांचीही भाषणे झाली.उषाताई गोले यांनी अध्यक्षीय भाषणातून बोलताना विज्ञानाच्या माध्यमातूनच आपन चांगली प्रगती करू शकतो आणि लोणार विज्ञान महोत्सवाचे छोटेसे लावलेले रोपटे आज राष्ट्रीय पातळीवर पोहचले याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. लोणार विज्ञान महोत्सवाच्या माध्यमातून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व सहभागी महाविद्यालयांनी येथे येऊन लोणार सरोवरचा संवर्धन आणि विकास करण्यासाठी ज्या संकल्पना मांडल्या त्या कृतीत आणण्यासाठी या लोणार विज्ञान महोत्सवाच्या माध्यमातून सतत प्रयत्न करू असे त्या म्हणाल्या.यानंतर डॉ प्रकाश बनमेरू, डॉ . संतोष क.बनमेरू व डॉ. मिलिंद गायकवाड यांनी लिहिलेल्या लोणार सरोवर वरील संशोधन पुस्तकाचे मान्यवरांचे असते अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन समन्वयक प्रा. सौरभ गायकवाड, सूत्रसंचालन प्रा. शारीक शेख यांनी केले. दुपारच्या सत्रात डॉ.कल्पना चावला सायन्स सेंटर लोणावळा येथील डॉ. संजय पुजारी व त्यांची टीम यांनी विज्ञानाचे प्रयोग अतिशय सोप्या पद्धतीने व विद्यार्थ्यांसोबत हसत खेळत सादर केले. या कार्यक्रमानंतर विज्ञान प्रदर्शनी मॉडेल आणि पोस्टर त्यांचे मूल्यांकन करण्यात आले. तसेच या सायन्स टॅलेंट ऑनलाइन प्रश्नमजुषा सुद्धा घेण्यात आली. या महोत्सवामध्ये विविध महाविद्यालयातून २६८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम फिरती प्रयोगशाळा, अमळनेर येथील फिरती प्रयोगशाळे मधील ज्ञानाचे प्रयोग समजून घेतले. यावेळी विद्यार्थ्यांना डॉ. अनिरुद्ध पाटील आणि त्यांचे सहकारी यांनी मार्गदर्शन केले. तसेच ही प्रयोगशाळा महाराणा प्रताप हायस्कूल, विवेकानंद शाळा आणि सरदार पटेल हायस्कूल इथेही जाऊन शाळेतील विद्यार्थांना विज्ञानाचे प्रयोग समजून सांगितले दुसऱ्या दिवशी दि. ५ मार्च रोजी महोत्सवचा निरोप समारंभ पार पडला आणि विविध स्पर्धांमध्ये पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांची नावे जाहीर करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यामधे बनमेरू विज्ञान महाविद्यालय लोणार, बुरुंगले महाविद्यालय शेगाव , शिवाजी महाविद्यालय मोताळा खंडेलवाल महाविद्यालय अकोला नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबीड , जिजामाता महाविद्यालय बुलढाणा आणि कमलाबाई बनमेरू महाविद्यालय, लोणार येथील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

## आशिष देरकर यांची सरपंच परिषदेच्या जिल्हा समन्वयकपदी निवड

**चंद्रपूर | प्रतिनिधी**



सरपंच परिषद मुंबईच्या वतीने चंद्रपूर जिल्हा सरपंच परिषदेच्या जिल्हा समन्वयकपदी जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी येथील उपसरपंच प्रा. आशिष देरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सरपंच परिषद, मुंबईचे प्रदेश उपाध्यक्ष ड. विकास जाधव यांनी शुक्रवारी पत्र पाठवून ही नियुक्ती केली. प्रा. आशिष देरकर गेल्या दोन पंचवार्षिकपासून बिबी ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून कार्यरत असून नाविन्यपूर्ण विकासकामे करून गावाचे नावलौकिक वाढविले आहे. जिल्ह्यात सरपंच परिषदेचे संघटन मजबूत करुन सरपंच मंडळींच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचा निर्धार प्रा. आशिष देरकर यांनी केला आहे. निवडीबद्दल सरपंच परिषद मुंबईचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे, प्रदेश उपाध्यक्ष ड. विकास जाधव, प्रदेश सरचिटणीस राजू पोतनीस, राज्य प्रसिद्धी प्रमुख संजय (बापू) जगदाळे व मित्रमंडळींनी अभिनंदन केले.

## वनमित्र चैतन्यस्वर मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी

**चिमूर | प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यात शंकरपूर पासून पाच किमी अंतरावरील अंबाई निंबाई पहाडी देवस्थान रानझरी दहेगाव येथे आज महाशिवरात्री निमित्त भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले. हे आयोजन पहाडी ला लागून असलेली दहेगाव झरी इरवा कवडसी देश या गावातील नागरिकांनी एकत्र येऊन या यात्रेचे आयोजन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी केले. या यात्रेला परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने गर्दी केली



चैतन्यस्वर देवस्थान भव्य अशा उंच पहाडीवर असून या ठिकाणी मोठे शिवलिंग व शंकरजी ची मूर्ती आहे आणि शिव मंदिराच्या बाजूला पाच पाण्याचा मोठा नाग विराजमान असून त्यावर श्रीकृष्ण बसलेले आहेत मंदिराच्या अगदी समोर नंद्याची मोठी देखणी मूर्ती असून त्यामागे तपस्वी भुऱ्या भक्ताची उभी असलेली देखणी मूर्ती भक्तांना आकर्षित करीत आहे. सभोवतालचा परिसर हा झाडाझुडपांनी जंगलांनी व्यापला असून पहाडावरील दगडाने या परिसराला सुशोभित केले आहे.अशा या आल्हाददायक वातावरणात महाशिवरात्री च्या यात्रे निमित्त या ठिकाणी मोठी यात्रा भरली असून परिसरातील भाविक भक्तांनी शिव शंकराचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. आंबाई निंबाई पहाडी सामाजिक संस्था रानझरी दहेगाव यांच्या वतीने या ठिकाणी गोपाल काल्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. व सायंकाळी चार वाजता सर्व भाविकांसाठी महाप्रसादाच्या कार्यक्रमाची आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ भाविक भक्तांनी घेतला.

## सनराइज् योगा ग्रुपचा महिला दिन उत्साहात



**कोरपना | प्रतिनिधी**


सनराइज् योगा ग्रुप, गडचांदूरच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने स्थानिक बालाजी सभागृहात महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी महिलांसाठी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. महिलांकरिता मार्गदर्शन व विविध नृत्यांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापिका स्मिता चिताडे उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ. दिलीप चौधरी उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच परिषदेचे जिल्हा समन्वयक प्रा. आशिष देरकर, डॉ. गुलवाडे, नलिनी खेकडे, अर्चना चौधरी, ममता बोढाले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महिलांनी वेगवेगळे नृत्य सादर केली.कार्यक्रमाचे संचालन अंजली कुरेकर यांनी केले प्रास्ताविक सनराइज् योगा ग्रुपच्या संचालक कुंतल चव्हाण यांनी केले. यशस्वीतेकरिता सर्व महिलांनी सहकार्य केले.

## ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सुदर्शन रापतवार

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

मराठवाडा साहित्य परिषद अंबाजोगाई शाखेच्या वतीने घेण्यात येणा-या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सुदर्शन रापतवार यांची निवड घोषित करण्यात आली.मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाई च्या वतीने दर दोन वर्षांनी अंबाजोगाई साहित्य संमेलन घेण्यात येत असते. आता पर्यंत १० संमेलन पार पडली. या वर्षी ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलन अंबाजोगाई येथे आयोजित केले जाणार आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी पत्रकार, लेखक व सामाजिक कार्यकर्ते सुदर्शन रापतवार यांची निवड करण्यात आली. ही निवड मसाप अंबाजोगाई कार्यकारिणीच्या बैठकीत एकमताने करण्यात आली आहे.



मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक शाखा अध्यक्ष दगडू लोमटे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. त्यात ही निवड जाहीर करण्यात आली अशी माहिती सचिव गोरख शेंद्रे यांनी दिली आहे. यापूर्वी मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष पद डॉ. श्रीहरी नागरगोजे, दगडू लोमटे, विद्याधर पांडे, एस. बी. सय्यद, डॉ. राहुल धाकडे, संतोष मोहिते, कमलताई बरुळे व डॉ. बाबू खडकभावी यांनी भुषविले आहे. आणि संमेलन यशस्वी केले आहे. अंबाजोगाई साहित्य संमेलन हे रसिकांच्या आश्रयाने घेण्यात येते. २०० रुपये स्वागत मूल्य देवून याचे स्वागत सदस्य होता येईल व त्या खर्चातून हे संमेलन आयोजित केले जाते. आगामी ११ व् अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार हे गेली चाळीस वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत आहेत. सकारात्मक पत्रकारीते सोबतच शोध पत्रकारितेत त्यांची विशेष रुची आहे. महाराष्ट्रातील अनेक दैनिकातुन विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने लिखाण केले आहे. पत्रकारीते सोबतच सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग आहे. जयवंती नदी स्वच्छता मोहीम, अक्षर मानव राज्यस्तरीय कार्यशाळा, अन्नत्याग आंदोलनात त्यांचा मोठा सहभाग असतो. मेडिकल बचाव कृती समिती, जिल्हा निर्मिती आंदोलन, पत्रकार अत्याचार विरोधी आंदोलनासह शहरातील विविध प्रश्नांवरील आंदोलनात त्यांचा सहभाग असतो. विविध प्रश्नांवर चौकस बुध्दीने सकारात्मक लेखन करणारा पत्रकार म्हणून त्यांची ओळख आहे.आज पर्यंत त्यांना १५ पेक्षा जास्त मानाचे व प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. उत्तम संघटक म्हणूनही त्यांची ख्याती आहे. या निवडीबद्दल म.सा.प. कार्यकारिणीच्या बैठकीत त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यकारिणी पदाधिकारी सर्वश्री ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब, दगडू लोमटे, गोरख शेंद्रे, डॉ. शैलजा बरूरे, डॉ. देविदास खोडेवाड, प्रा. विष्णू कावळे आदी सदस्य यावेळी उपस्थित होते. सदरील निवडीबद्दल सुदर्शन रापतवार यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## महाशिवरात्रीनिमित्त वडगावात भजन संमेलन

### बालगोपालांनी केले उद्घाटनिय भजन

**कोरपना | प्रतिनिधी**

तालुक्यातील वडगाव येथे ह.भ.प. विठ्ठल डाखरे महाराज यांच्या संकल्पनेतून भजन संमेलनाचे आयोजन महाशिवरात्रीच्या निमित्ताने शुक्रवारी पार पडले.

या संमेलनात परिसरातील विविध गावातील महिला भजन मंडळींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य उत्तम पेचे उपस्थित होते तर उद्घाटन जिल्हा स्मार्ट ग्राम बिबीचे उपसरपंच आशिष देरकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी मंचावर ग्रामपंचायत वडगावचे उपसरपंच सुदर्शन डवरे, त. मु. अध्यक्ष भोंगळे गुरुजी, पो.पा. कलावती मडावी, ग्रामपंचायत सदस्या संचीता मडावी, सदस्य शामकांत निखाडे, कैलाश मेश्राम, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य शंकर पिंगे, भाऊराव उरकुडे, वासुदेव पिंपळकर,



अशोक आस्कार, रागीट महाराज उपस्थित होते. भजन संमेलनात एकूण दहा भजन मंडळींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे संचालन रामचंद्र काकडे यांनी केले. तर आभार स्वप्निल पाचभाई यांनी मानले.

## अन त्या मंदिरात उसळली भाविकांची गर्दी

**सिंदीरेल्वे | प्रतिनिधी**

शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या नंदा नदीच्या काठावर शंकराच्या मंदिरात शुक्रवारी सायंकाळी आरती झाल्यानंतर पिंडीवर अचानक भगवान शंकराची प्रतिमा दिसून आली. ही चर्चा वाऱ्यासारखी गावभर पसरली आणि शहरातील नागरिकांनी हा चमत्कार बघण्यासाठी तोबा गर्दी केली होती.

नंदा नदीच्या काठावर वानर देव मंदिराच्या शेजारी जुने शिवमंदिर आहे. बजरंग क्रीडा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सात वर्षांपूर्वी मंदिराचा जिर्णोद्धार केला.मंदिरातील पूजनाची व उत्सवांची जबाबदारी मंडळाच्या सदस्यांनी स्वीकारली आहे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने शहरातील सर्व मंदिराप्रमाणे येथे देखील भाविक भक्तांनी दिवसभर दर्शनासाठी गर्दी केली होती. दिवसभर धार्मिक कार्यक्रम पार पडले.रात्री नऊच्या सुमारास त्या मंदिरातील शंकरजी



च्या पिंडीवर शंकर भगवानांचे मुखकमल तयार झाल्याचा साक्षात्कार अनेकांना जाणवला. हे नवल बघण्यासाठी शहरातील भाविकांनी तूफान गर्दी केली. रात्री जमा झालेला जनसमुदाय शनिवारी पहाटे पांच नंतरही मंदिरातून हटण्याचे नाव घेत नव्हता,हे येथे उल्लेखनीय!.शनिवारी दिवसभर या घटनेचीच शहर आणि परिसरात चर्चा सुरु आहे.

## आरोग्य केंद्राच्या दोन मजली इमारतीचे लोकार्पण

**चिमूर | प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दोन मजली सुसज्ज इमारतीच्या लोकार्पण सोहळा शनिवारी दुपारी बारा वाजता साजरा करण्यात आला. हा लोकार्पण सोहळा शंकरपूरचे सरपंच साईश सतीश वारजूकर यांच्या हस्ते करण्यात आला. सन २०२२ -२३ या वित्तीय वर्षात जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष डॉक्टर सतीश वारजुकर यांच्या प्रयत्नाने जिल्हा परिषदेच्या जिल्हा वार्षिक योजनेतून दोन मजली प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत मंजूर झाली होती. मार्च २०२४ पर्यंत सर्व सोयींनी सुसज्ज अशा या इमारतीचे काम पूर्ण झाल्याने याचा लोकार्पण सोहळा शंकरपूर ग्रामपंचायत च्या वतीने करण्यात आलेला आहे.



यावेळी शंकरपूर ग्रामपंचायतचे सरपंच साईस वारजूकर, उपसरपंच अशोक चौधरी, ग्रामपंचायत सदस्य शंकर शेरकी, निखिल गायकवाड, गीता ननावरे, रंजना उईके, सपना घडसे, अमोद गौरकर आशिष टिपले, आदी मान्यवर उपस्थित होते.

# वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून महादेव वन निसर्ग परिचय केंद्राचे लोकार्पण

## महाशिवरात्रीचे औचित्य साधत श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थानचा पर्यावरणस्नेही विकास

**भीमाशंकर । प्रतिनिधी**

महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर भीमाशंकर येथे महादेव वन निसर्ग परिचय केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. शुक्रवारी (ता. ८) पार पडलेल्या या कार्यक्रमाला राज्याचे वनमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते व्हर्चुअल पद्धतीने या केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थानचा पर्यावरणस्नेही विकास करण्याची ग्वाही वनमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली होती. देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी सुमारे १४० कोटी रुपयांचा आराखडा सादर झाला होता. त्यानुसार विकास कामे वेगाने करण्यात आली. आता भीमाशंकर येथे वन निसर्ग पर्यटन केंद्र साकारण्यात आले असून लोकांसाठी खुले करण्यात आले आहे.



श्री क्षेत्र भीमाशंकर हे बारा ज्योर्तिलिंगापैकी सहावे ज्योर्तिलिंग आहे. त्याला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा आहे. येथे दरवर्षी साधारणत: २५ लाख भाविक दर्शनासाठी येतात. भाविकांची संख्या लक्षात घेत श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थानचा पर्यावरणस्नेही विकास करण्यासाठी ना.सुधीर मुनगंटीवार यांनी यापूर्वी बैठक घेत वनविभागाला प्रस्ताव तयार करण्यासाठी निर्देश दिले. त्या कामांचे प्रस्ताव तयार करून ते केंद्र सरकारकडून मंजूर करण्यासाठी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला.वनमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार महादेव वनात रुद्राक्षाच्या रोपांबरोबर पांढऱ्या फुलांची तसेच बेलाच्या सर्व प्रजातींची लागवड केली आहे. सोबतच येणारे भाविक आणि पर्यटक यांच्यासाठी निसर्गाची विविध माहिती देणारे केंद्र असून त्यामध्ये निसर्ग प्रेमींना पश्चिम घाटातील जैवविविधता, औषधी वनस्पती तसेच वन्य प्राण्यांची माहिती केंद्रात देण्यात आली आहे. तसेच विविध प्रकारचे माहिती देणारे फलक लावण्यात आले आहे. महादेव वनातील इंडिया मॅप मध्ये भारतामधील बारा ज्योतिर्लिंग दर्शक नकाशा याची माहिती दर्शविण्यात आली आहे तसेच महादेव वन हे भीमाशंकरला येणारे भावीक व पर्यटकांसाठी दिनांक ८-०३-२०२४ पासुन खुले करण्यात आले आहे.लोकार्पण सोहळ्याला पुण्याचे मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण, निवृत्त मुख्य वनसंरक्षक रवींद्र वानखेडे, भीमाशंकर देवस्थानचे अध्यक्ष सुरेश कौदरे, वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक तुषार चव्हाण, सहाय्यक वनसंरक्षक किशोर येळे, वनपरिक्षेत्र अधिकारी वसंत चव्हाण आदी उपस्थित होते.

---

### 'त्या' जमिनीचे संपादन व मोबदला वाटप नियमानुसारच

# बरांज (मो) येथील दिव्यांग प्रकल्पग्रस्त जमीन प्रकरणी उपविभागीय अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भद्रावती तालुक्यातील बरांज (मोकासा) येथील दिव्यांग प्रकल्पग्रस्त देवानंद पुनवटकर यांचे जमीन संपादन व मोबदला वाटप नियमानुसारच केल्याचा खुलासा वरोराचे उपविभागीय अधिकारी यांनी केला आहे.

बरांज मोकासा येथील भीमराव उद्धव पुनवटकर, संतोष उद्धव पुनवटकर, देवानंद उद्धव पुनवटकर आणि माजरी कॉलरी येथील सुलोचना वि. उद्धव पुनवटकर यांच्या मालकीची सर्व्हे नं. २८१ आराजी १.०८ शेतजमीन प्रकरण क्र. ८/६५/२००५-०६, निवाडा दि. २३ ऑक्टोबर २००९ रोजी व्हाईस प्रेसिडेंट, कर्नाटक एम्टा कोलमाईन्स लिमिटेड बंगलोर, शाखा नागपूर यांच्याकरीता संपादीत करण्यात आली होती. सदर कंपनीकरीता वरील निवाड्याप्रमाणे ३३० शेतक-यांची एकूण ३५४.४८ हे. आर. जमीन संपादीत करण्यात आली. निवाड्याप्रमाणे सर्व्हे नं. २८१ आराजी १.०८ हे. आार. करीता हेक्टरी दर १ लक्ष ८० हजार ७०० रुपये देण्यात आला. त्यानुसार जमिनीचे एकूण मुल्यांकन १ लक्ष ९५ हजार १५६ रुपये एवढे होते.त्यावर ३० टक्के दिलासा रक्कम ५८५४७ रुपये व १२ टक्के प्रतिवर्ष प्रमाणे अतिरिक्त घटकाची १७ जानेवारी २००७ ते २३ ऑक्टोबर २००९ पर्यंत एकूण १०१० दिवसांची ६४८०२ रुपये अशी एकूण ३ लक्ष १८ हजार ५०२ रुपयांची रक्कम भीमराव उद्धव पुनवटकर, संतोष उद्धव पुनवटकर, देवानंद उद्धव पुनवटकर आणि माजरी कॉलरी येथील सुलोचना वि. उद्धव पुनवटकर यांनी दि. ६ जून २०१३ रोजी धनादेश क्रमांक ०२८७२६ अन्वये बँक खात्यात जमा करण्यात आली. तशी पोच मोबदला वाटप नोंदवहीमध्ये असून जमीन भुसंपादन व मोबदला वाटप नियमानुसारच केल्याचे स्पष्टीकरण वरोराचे उपविभागीय अधिकारी यांनी केला आहे.

---

### बॉटनिकल गार्डनच्या उद्धाटन सोहळ्यानिमित्त चंद्रपूर-बल्लारपूर रस्त्यावरील जड वाहतुकीस प्रतिबंध

# पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर तालुक्यातील मौजा विसापूर येथे ११ मार्च २०२४ रोजी बॉटनिकल गार्डनचा उद्धाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाकरीता मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहे. सोबतच या कार्यक्रमाकरीता राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर मंत्री येण्याची शक्यता आहे. त्यामुळे चंद्रपूर ते बॉटनिकल गार्डन, विसापूर या मार्गावरून मंत्री महोदयांचे आगमन व निर्गमन होणार असल्याने त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये म्हणून सदर मार्गावरील अवजड वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे.

याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमित केले असून ११ मार्च २०२४ रोजी दुपारी २ वाजतापासून रात्री ९ वाजेपर्यंत बामणी फाटा, बल्लारपूर ते बंगाली कॅम्प, चंद्रपूर या मार्गावर अवजड वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत अवजड वाहतूकदारांनी खालीलप्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

१.वरोरा, भद्रावती व चंद्रपूरकडून राजुरा किंवा गडचांदूरकडे जाण्यासाठी पडोली - धानोरा फाटा भोयगाव रस्त्याचा वापर करावा.

२.गडचांदूर व राजुरा कडून वरोरा, भद्रावती, चंद्रपूरकडे येण्यासाठी भोयगाव - धानोरा फाटा - पडोली या मार्गाचा वापर करावा.

३.गोंडपिपरी व कोठारी कडून चंद्रपूर किंवा मूलकडे जाण्यासाठी येनबोडी - पोंभुर्णा तर चंद्रपूर व मूल कडून बल्लारशहा, गोंडपिपरी, राजुराकडे जाण्याकरीता पोंभुर्णा - येनबोडी या मार्गाचा वापर करावा.वरील आदेशाचे पालन करून जड वाहतुकदारांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.


---

### बांबू पासून महिलांनी तयार केली ज्वेलरी

# बांबू ज्वेलरी प्रशिक्षणातून महिलांना मिळाले उपजिवीकेचे साधन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

झपाट्याने विस्तार होत असलेल्या बांबू क्षेत्रात प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना उपजीविकेचे साधन प्राप्त व्हावे, या उद्देशाने चिचपल्ली येथील बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रात (बीआरटीसी) आठ दिवसीय ज्वेलरी प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी महिलांनी बांबू पासून ज्वेलरी तयार करून आपल्यातील सुप्त कलागुणांचे सादरीकरण केले.



ज्वेलरी प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप नुकताच करण्यात आला. २० महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. बाजारपेठेत असलेल्या विविध धातूच्या ज्वेलरी आपल्याला नेहमीच दिसतात, परंतु बांबू वस्तुंची वाढती मागणी लक्षात घेता या प्रशिक्षणात महिलांना विविध प्रकारची बांबू ज्वेलरी तयार करण्याचा लाभ आवश्यक साधनसामुग्री सह देण्यात आला. प्रशिक्षणाकरिता संपूर्णा बांबू केंद्र मेळघाट येथून विजय काकडे, कृष्णा मासादे या प्रशिक्षकांना बोलविण्यात आले होते. या प्रसंगी महिलांनी प्रशिक्षणातून विविध डिझाईन मध्ये बांबूपासून ज्वेलरी तयार केली. यावेळी जिल्ह्यातील विविध बांबू वस्तू उत्पादक व खरेदीदार यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवून महिलांनी तयार केलेल्या ज्वेलरीचे कौतुक केले आणि खरेदीसुध्दा केले. अश्या प्रशिक्षणातून ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांचा आर्थिक विकास होईल, असा विश्वास केंद्राचे संचालक अशोक खडसे यांनी व्यक्त केला. यावेळी समाजकार्य महाविद्यालयाचे डॉ. सुभाष गिरडे, बीआरटीसी चे पर्यवेक्षक योगिता साठवणे, वनपाल एस. एस. लाटकर आदी उपस्थित होते.

---

# अकोळनेर येथील क्लस्टरमुळे विकासाला चालना मिळून रोजगार निर्मिती होणार-केंद्रीय मंत्री नारायण राणे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अकोळनेरसारख्या दुर्गम भागात उभारण्यात येणाऱ्या क्लस्टरमुळे या भागातील विकासाला चालना मिळून रोजगार निर्मिती होणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी केले.अहमदनगर तालुक्यातील अकोळनेर येथे सुक्ष्म, लघू ,मध्यम उद्योग मंत्रालय व महाराष्ट्र शासन उद्योग विभागाच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या सामूहिक सुविधा केंद्राचे भूमीपूजन केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी खासदार डॉ सुजय विखे पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवंगे, क्लस्टरचे अध्यक्ष राजेंद्र वाघ, उपाध्यक्ष सचिन सातपुते,राजेंद्र निंबाळकर आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री राणे म्हणाले की, समाजातील गोरगरीब व सर्वसामान्यांसह ग्रामीण भागाचा विकास करण्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्राधान्य दिले आहे. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊन दरडोई उत्पन्न वाढून राज्याच्या व देशाच्या जीडीपी दरात वृद्धी व्हावी, यासाठी अधिक प्रयत्न करण्यात येत असून उद्योग विभागाच्या माध्यमातून देशातील प्रत्येक राज्याच्या ग्रामीण भागात उद्योग धंदे वाढीसाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.भारताची अर्थव्यवस्था आजघडीला पाचव्या क्रमांकावर आहे. भारत देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर नेण्यासाठी पर कॅपिटा उत्पन्न वाढवण्याची गरज आहे. राज्यातअहमदनगर जिल्ह्याची समृद्ध जिल्हा म्हणून ओळख असून जिल्ह्याने पर कॅपिटा दर वृद्धीसाठी अधिक जोमाने काम करत जगाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर नेण्यासाठी आपला अधिकाधिक सहभाग देण्याचे आवाहनही केंद्रीय मंत्री श्री राणे यांनी यावेळी केले.खासदार डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० युवकांना रोजगार देणाऱ्या क्लस्टरला मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी २२ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री श्री राणे यांच्या माध्यमातून जिल्ह्यात तीन क्लस्टर मंजूर करण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास ग्रामस्थ, युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# जागतिक महिला दिनानिमित्त रॅलीचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन



**परभणी । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त महिला व युवतीसाठी दुचाकी मोटार वाहनाच्या रॅलीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.


यावेळी मनपा आयुक्त श्रीमती तृप्ती सांडभोर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांची उपस्थिती होती. या रॅलीमध्ये महाविद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय, सेवाभावी संस्था, क्रीडा संघटना यांचा सहभाग होता. दुचाकी मोटार वाहन रॅलीची सुरुवात वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, काळी कमान वसमत रोड, श्री शिवाजी महाराज पुतळा, रेल्वे स्टेशन, बसस्टॅन्ड, उड्डाणपुल, जिंतुर रोड मार्गे जांब नाका, सरकारी दवाखाना, शिवाजी चौक, गुजरी बाजार मार्ग गांधी पार्क, नारायणचाळ, महात्मा ज्योतीबा फुले पुतळा मार्गे जिल्हा क्रीडा संकुल येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

---

### महाशिवरात्री निमित्त देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक जोतिर्लिंग प्रभू वैधनाथाचे

# कृषी मंत्री धनंजय मुंडे,खा.प्रीतम मुंडे, पंकज मुंडे,यांनी प्रभू वैधनाथाचे घेतले दर्शन





**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लोकप्रिय कलाकार हास्य सम्राट म्हणून ओळख असलेले सुप्रसिद्ध चला हवा द्या फेम भारत गणेशपुरे, यांनी परळी येथील श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाचा लाभ घेत अभिषेक महापूजा केली, महाशिवरात्री निमित्त महापूजा बीड जिल्हाधिकारी, दीपा मुधोळ, मुंडे यांच्या हस्ते करण्यात आली, तसेच मा, खा, प्रीतम ताई मुंडे, पंकजाताई मुंडे, यांनी श्री क्षेत्र सोमेश्वर महाराज जिरेवाडी येथून आलेल्या पालखीच्या दर्शनाचा लाभ घेतला,परळी वैधनाथ नगरी लाखो भाविक भक्तांनी दुमदुमली! लाखो भाविकांची अलोट गर्दी झाली आहे. रात्री बारा वाजेपासूनच वैद्यनाथ मंदिर परिसरात भाविकांच्या रांगा सुरू झाल्या. हर हर महादेव, श्री प्रभू वैद्यनाथ भगवान की जय, असा जयघोष करीत भाविक दर्शनाचा लाभ घेत होते,आज वैधनाथ मंदिर परिसर सजावट रंगीबेरंगी पुष्प लाईट सजवला असून महिलाचे दागिने पर्स, चोरीस जाऊ नये,सी,सी, टीव्ही मध्ये नजर कैद करण्यात आला, तसेच महिला पोलीस कर्मचारी, पोलीस, होमगार्ड असा तगडा बंदोबस्त करण्यात आला, महाशिवरात्रीनिमित्त राज्य व पर राज्यातून भाविक श्री वैजनाथांच्या दर्शनासाठी परळीत दाखल झाले आहेत, धर्मदर्शन घेऊ इच्छिणाऱ्या महिला व पुरुषांची रांग व पास धारकांची स्वतंत्र रांग लावण्यात आली आहे. मंदिर परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे . रात्री बारा वाजल्यापासूनच भाविकांची वैजनाथ मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी सुरू झाली असल्याची माहिती वैजनाथ देवस्थान ट्रस्टचे सेक्रेटरी प्रा बाबासाहेब देशमुख यांनी दिली

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .